तरुण भारत कोल्हापूर

शुक्रवार, ९ ऑक्टोबर २०१५

# पर्यावरण संवर्धनाचा 'कोल्हापूर पॅटर्न' कौतुकास्पद

## महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे निवृत्त सदस्य डॉ.दिलीप बोराळकर यांचे प्रतिपादन : वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव

प्रतिनिधी
कोल्हापूर

रंकाळा आणि पंचगंगा प्रदूषणाचा प्रश्न असेल किंवा कचरा प्रकल्पाचा प्रश्न असेल कोल्हापुरकरांनी लोकसहभागातून याच्या विरोधात लढा उभारला आहे. सर्वोच्च न्यायालयाने याची दखल घेऊन पर्यावरण जागृती बाबतच्या कोल्हापूर पॅटर्नचे कौतुक केले आहे. अन्य राज्यातही पर्यावरण संवर्धनासाठी अशा प्रकारची आंदोलने उभारली जात आहेत. असे प्रतिपादन महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव (निवृत्त) डॉ.दिलीप बोराळकर यांनी केले. गुरुवारी किर्लोस्कर आयोजित वसुंधरा चित्रपट महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी ते शाहू स्मारक येथे बोलत होते.



कोल्हापूर : डॉ. दिलीप बोराळकर यांच्या हस्ते सिता अशोकाच्या रोपाला पाणी घालून वसुंधरा चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी (डावीकडून) कृष्णा गावडे, प्रकाश राव, आर. आर. देशपांडे, चंद्रकांत जोशी, दिलीप बापट, राहुल पवार.

पर्यावरणाच्या संवर्धनाची लोकांना प्रेरणा मिळावी आणि याबद्दलची चर्चा घडवून आणावी यासाठी किर्लोस्कर उद्योग समुहाच्यावतीने गेली पाच वर्षे कोल्हापुरमध्ये वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव आयोजित केला जातो. यंदाच्या महोत्सवाचे उद्घाटन डॉ.बोराळकर यांच्या हस्ते सिता अशोकाच्या रोपाला पाणी आणि खत घालून अभिनवपद्धतीने करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कलामहर्षी बाबुराव पेंटर फिल्म सोसायटीचे अध्यक्ष चंद्रकांत जोशी यांनी केले.

प्रदुषण आणि शासकीय भूमिका या विषयी डॉ बोराळकर म्हणाले, प्रदुषणाचा गंभीर प्रश्न सोडवण्यासाठी शासनस्तरावर अनेक उपाययोजना आखल्या जातात. पण स्थानिक स्वराज्य संस्था त्यांची अंमलबजावणी करत नाहीत. याचे कारण अनेकवेळा या योजना स्थानिक परिस्थितीचा अंदाज न घेता बनवलेलेल्या असतात. त्यामुळे त्या कार्यान्वित होत नाहीत. कॅगनेदेखील पर्यावरणाच्या आपल्या अहवालामध्ये काही सूचना केल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाने देशातील ७० महापालिकांना दंडदेखील केला आहे. स्थानिक साधने, मनुष्यबळ यानेच शहरांमधील घनकचऱ्याचे निर्मुलन करता येईल.

यावेळी फिश या लघुपटाचे प्रदर्शन करण्यात आले. या प्रसंगी कृष्णा गावडे, प्रकाश राव, किर्लोस्करचे व्यवस्थापकीय संचालक आर.आर.पाटील, चंद्रकांत जोशी, दिलीप बापट हे उपस्थित होते.